Study Tour Zen

अनेकान्त एज्युकेशन संस्थेचे

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

## इतिहास विभाग – सेंटर फॉर ओरिएंटल स्टडीज

## अभ्यास सहल अहवाल

दि. ११/०३/२०२३

प्रति,

मा. प्राचार्य

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,

बारामती.

महोदय,

इतिहास विभागाच्या सेंटर फॉर ओरिएंटल स्टडीज या उपक्रमाअंतर्गत शुक्रवार दि. १०/०३/२०२३ रोजी लोणी भापकर, ता. बारामती, जि. पुणे येथे एक दिवसीय अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर अभ्यास सहलीत एफ. वाय. बी. ए., एस. वाय. बी. ए. व टी. वाय. बी. ए. या वर्गातील तेवीस विद्यार्थी सहभागी झाले होते. ज्या विद्यार्थ्यांची वर्गातील नियमित उपस्थिती ७५ टक्क्यांपेक्षा अधिक आहे अशाच विद्यार्थ्यांना या अभ्यास सहलीत सहभागी करून घेण्यात आले.

या अभ्यास सहलीत विद्यार्थ्यांनी लोणी भापकर येथिल पेशवेकालीन काळभैरवाचे व दशभूजा दत्त मंदीर, यादवकालीन हेमाडपंथी मल्लिकार्जून मंदीर, सरदार सोनजी भापकरांच्या गढीचे अवशेष, अनेक वीरगळ इ. ठीकाणांना भेट दिली व त्यांचे ऐतिहासिक महत्व जाणून घेतले. या अभ्यास सहलीच्या वेळी मल्लिकार्जुन मंदीराच्या विश्वस्त मंडळाचे सदस्य व त्या मंदीराच्या दुरूस्तीचे काम व्हावे यासाठी सर्व पातळीवर प्रयत्न करणारे श्री. गोलांडे बी. एन. यांनी मल्लिकार्जुन मंदीराची माहीती देउन मोठे सहकार्य केले. या संपूर्ण प्रक्रीयेत अनेक वेळा सहभागी विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारून या ऐतिहासिक अवशेषांबाबत अधिक जाणून घेतले. ऐतिहासिक वास्तूंना डोळसपणे भेट देता आल्याने व ऐतिहासिक वस्तू प्रत्यक्ष हाताळता आल्याने सहभागी विद्यार्थी उल्हसित झाले व त्यांच्यात इतिहासाबाबत कुतूहल निर्माण झाले.

या अभ्यास सहलीत शिक्षकांमधून डॉ. संदीप संभाजी तारदाळकर व प्रा. डी. टी. मोहिते हे सहभागी झाले होते. तसेच अभ्यास सहलीच्या आयोजनात आपल्या संस्थेचे मा. अध्यक्ष, मा. सचिव, महाविद्यालयाचे मा. प्राचार्य, सर्व मा. उपप्राचार्य, रजिष्ट्रार यांनी मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन केले.

Noted
VD / IQAC

तु.च.कॉलेज,बारामती
आवक नंबर: SL 335
दिनांक: 11 MAR 2023

विभाग प्रमुख